**कार्यालयाचे नांव** :- आदिवासी उमेदवारांकरिता रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र, प्रशासकिय भवन, पहिला माळा, हॉल क्र. 5 चंद्रपूर.

**योजनेचे नांव** :- आदिवासी उमेदवारांसाठी स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण योजना.

विविध शासकिय व निमशासकीय कार्यालये व संस्थांमधील आदिवासी उमेदवारांठी राखीव पदे भरण्यांकरिता घेण्यांत येणा–या स्पर्धात्मक परिक्षांच्या स्वरूपाबाबत आदिवासी उमेदवारांना माहिती देवून त्या उत्तीर्ण होण्यांसाठी त्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षणाची आवश्यकता असल्याने प्रामुख्याने आदवासी वस्ती असलेल्या परिसरात खास आदिवासी उमेदवारांसाठी महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक इएमपी–1084/7306/(7779) सेयो–2, दिनांक,11 ऑक्टोंबर,1984 अन्वये सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यांत आली आहेत. चंद्रपूर येथील केंद्र ऑगस्ट,1986 पासून सुरू झालेले आहे.

**या केंद्राकरीता खालील पदे मंजूर करण्यांत आलेली आहेत.**

| अ.क्र. | पदाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| 1 | रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी – (वर्ग–2 ) | 1 |
| 2 | कनिष्ठ रोजगार व स्वयंरोगार मार्गदर्शन अधिकारी (वर्ग–3 ) | 1 |
| 3 | लिपीक–नि–टंकलेखक (वर्ग–3) | 2 |
| 4 | .शिपाई (वर्ग–4 ) | 1 |
| | **एकुण** | **5** |

**प्रशिक्षण कालावधी** :- प्रशिक्षण कालावधी साडेतीन महिण्यांचा असून एका वर्षात प्रशिक्षणची तीन सत्रे घेतली जातात. प्रशिक्षण सत्राची सुरूवात दर वर्षी 1 एप्रिल, 1 ऑगस्ट व 1 डिसेंबर पासून करण्यांत येते.

**शैक्षणिक पात्रता** :- प्रशिक्षणासाठी किमान शालांत परिक्षा पास ही पात्रता निर्धारित करण्यांत आलेली आहे. उच्च शैक्षणिक पात्रता व टंकलेखक/संगणक/लघुलेखन परिक्षा पास असलेल्या उमदेवारांना प्राधान्य देण्यांत येते.

**प्रशिक्षणार्थ्याची निवड** :- प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्यांकरीता स्थानिक/प्रादेशिक वृत्तपत्रामधून तसेच आकाशवाणी केंद्रावरून जाहिरात देवून अर्ज मागविण्यांत येतात तसेच जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून पात्र उमेदवारांची यादी मागविण्यांत येते. कोणत्याही जिल्हयातील आदिवासी प्रवर्गातील उमेदवार प्रशिक्षणासाठी अर्ज करू शकतात.

प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यासाठी मा. उपसंचालक, रोजगार व स्वयंरोजगार विभागीय मुख्यालय, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर व प्राचार्य, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर (शिक्षण क्षेत्र ) व रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी (केंद्रप्रमुख ) सदस्य असलेली समिती स्थापन करण्यांत आलेली आहे. जाहिरातीच्या माध्यमातून प्राप्त झालेले अर्ज तसेच जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडून प्राप्त झालेल्या यादया यातील उमेदवारांना मुलाखत पत्रे पाठवून प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलाविण्यांत येते व उपस्थित उमेदवारांच्या निवड समितींद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेवून उमेदवारांची निवड करण्यांत येते.

**विद्यावेतन :-** प्रशिक्षण काळात उमेदवारांना सुधारित दरानुसार रूपये 1000/– द.म. या दराने विद्यावेतन दिले जाते. प्रशिक्षण काळात उमेदवारांना चार रजा देय आहेत. यापेक्षा जास्त अनुपस्थिती झाल्यास अनुपस्थित दिवसाचे विद्यावेतन कपात करण्यांत येते.

**प्राध्यापकांना मानधन :-** प्रशिक्षण काळांत उमेदवारांना इंग्रजी, गणित, सामान्य ज्ञान, बुध्दिमत्ता व व्यक्तिमत्व विकास हे विषय त्या विषयात तज्ञ असलेल्या प्राध्यापकांकडून शिकविले जातात. प्राध्यापकांची सेवा मानधन तत्वावर उपलब्ध करून घेतली जाते. मानधन दर तासाला सुधारित दरानुसार रू. 100/– या दराने दिले जाते.

.नियमित प्रशिक्षणासोबतच प्रशिक्षणार्थ्यांना विविध संस्थेमार्फत राबविण्यांत येणा–या स्वयंरोजगारांच्या योजना रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाच्या योजना इत्यादी बाबतची माहिती केंद्रप्रमुखांकडून दिली जाते. व इच्छूक उमेदवारांना स्वयंरोजगारांसाठी प्रोत्साहित करण्यांत येते.

**चाचणी परिक्षा :-** दर महिण्यांत शिकविलेल्या भागावर उमेदवारांची इंग्रजी, गणित, सामान्य ज्ञान व बुध्दीमत्ता या चार विषयाची लेखी चाचणी परिक्षा घेतली जाते. चाचणी परिक्षेचे पेपर्स संबंधित प्राध्यापकांकडून तपासून घेवून प्राप्त गुण उमेदवारांना कळविले जातात.

**ग्रंथालय :-** केंद्रात ग्रंथालयाची सोय उपलब्ध असून विविध स्पर्धा परिक्षांसाठी उपयुक्त असलेली पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत. उमेदवारांना वाचण्यांकरीता पुस्तके उपलब्ध करून देण्यांत येतात.

तसेच रोजगार समाचार, इंग्रजी व मराठी प्रादेशिक/ स्थानिक वृत्तपत्रे केंद्रात उपलब्ध असून उमेदवारांना वाचण्याकरीता उपलब्ध करून देण्यांत येतात. ग्रंथालय सुविधा सर्व प्रवर्गातील बेरोजगारांसाठी उपलब्ध आहे.

?



**<u>सांस्कृतीक कार्यक्रम</u>** :- उमेदवारांच्या व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीने गट चर्चा, वाद–विवाद स्पर्धा, गायन स्पर्धा इत्यादि कार्यक्रम घेण्यांत येतात. तसेच सत्र समाप्तीचे दिवशी मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीत समारोप कार्यक्रम घेण्यांत येतो.

**<u>प्रशिक्षणानंतरची अनुवर्ती कार्यवाही (पाठपुरावा )</u>** :- प्रशिक्षण काळात वृत्तपत्रात प्रसिध्द होणा–या स्पर्धा परिक्षांची तसेच रिक्त पदांच्या जाहिराती बाबत उमेदवारांना माहिती देवून पात्र उमेदवारांना अर्ज करण्यांबाबत मार्गदर्शन करण्यांत येते तसेच प्रशिक्षण पुर्ण करून गेलेल्या उमेदवारांना रिक्त पदांबाबतची माहिती पत्राद्वारे कळवून त्यांना विहित तारखेच्या आंत अर्ज करण्यांबाबत मार्गदर्शन करण्यांत येते.

तसेच शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार बाबतच्या नविन धोरणानुसार आदिवासी उमेदवारांच्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था स्थापन करून संस्थेच्या माध्यमातुन आदिवासी उमेदवारांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यांचे प्रयत्न सुध्दा करण्यांत येतात.

.केंद्राच्या निर्मितीपासून प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेले उमेदवार / नोकरीस लागलेले / स्वयंरोजगार सुरू केलेले उमेदवार, योजनेवर झालेला खर्च ईत्यादी बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | प्रवेश घेतलेले उमेदवार | लाभ घेतलेले उमेदवार | प्रशिक्षण पुर्ण केलेले उमेदवार | .किती उमेदवार नोकरीस लागले. | .उमेदवारांच्या विद्यावेतनावर झालेला खर्च | प्राध्यापकांच्या मानधनावर झालेला खर्च | .आस्थपना–वर झालेला खर्च | एकूण झालेला खर्च | आर्थिक तरतूद (बजेट ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | <u>1986–87</u> 53 | 51 | 45 | 5 | 34,002 | 11,925 | 1,35,611 | 1,81,538 | 1,82,000 |
| 2 | <u>1987–88</u> 85 | 78 | 71 | 9 | 52,600 | 21,400 | 1,35,783 | 2,09,783 | 2,12,200 |
| 3 | <u>1988–89</u> 85 | 84 | 73 | 15 | 50,868 | 21,000 | 1,70,569 | 2,42,437 | 2,52,000 |
| 4 | <u>1989–90</u> 87 | 78 | 56 | 41 | 44,071 | 21,350 | 1,69,202 | 2,34,623 | 2,76,000 |
| 5 | <u>1990–91</u> 94 | 82 | 62 | 41 | 45,948 | 29,415 | 1,90,715 | 2,66,078 | 2,59,000 |
| 6 | <u>1991–92</u> 107 | 98 | 89 | 24 | 72,232 | 33,440 | 2,23,146 | 3,28,818 | 3,39,000 |
| 7 | <u>1992–93</u> 109 | 103 | 96 | 31 | 1,22,068 | 32,800 | 2,35,333 | 3,90,201 | 3,79,000 |
| 8 | <u>1993–94</u> 112 | 108 | 93 | 13 | 1,17,017 | 34,160 | 1,88,788 | 3,39,965 | 3,41,000 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1994–95 112 | 106 | 88 | 31 | 1,16,212 | 33,960 | 2,19,012 | 3,69,184 | 2,44,000 |
| 10 | 1995–96 110 | 100 | 86 | 26 | 1,17,204 | 36,560 | 1,08,188 | 2,61,952 | 4,15,716 |
| 11 | 1996–97 102 | 87 | 75 | 27 | 93,330 | 31,440 | 2,81,502 | 4,06,272 | 3,86,000 |
| 12 | 1997–98 108 | 97 | 71 | 24 | 90,794 | 33,640 | 3,01,255 | 4,25,689 | 3,49,000 |
| 13 | 1998–99 87 | 78 | 59 | 7 | 74,428 | 32,920 | 2,97,802 | 4,05,150 | 4,05,150 |
| 14 | 1999–2000 85 | 70 | 62 | 4 | 76,618 | 34,840 | 5,71,089 | 6,82,547 | 4,61,000 |
| 15 | 2000–01 106 | 88 | 77 | 2 | 91,825 | 30,520 | 5,50,660 | 6,73,005 | 6,30,000 |
| 16 | 2001–02 94 | 90 | 79 | 14 | 1,03,531 | 37,440 | 5,05,883 | 6,43,854 | 5,26,040 |
| 17 | 2002–03 79 | 75 | 60 | – | 80,929 | 34,560 | 5,36,198 | 6,51,687 | 6,95,800 |
| 18 | 2003–04 71 | 67 | 55 | 47 | 70,793 | 33,000 | 6,78,407 | 7,82,200 | 7,34,300 |
| 19 | 2004–05 94 | 84 | 68 | 86 | 84,615 | 28,600 | 7,32,869 | 8,46,084 | 9,60,500 |
| 20 | 2005–06 115 | 100 | 84 | 41 | 1,14,257 | 40,500 | 5,54,409 | 7,09,166 | 7,10,000 |
| 21 | 2006–07 118 | 108 | 94 | 27 | 3,70,476 | 77,700 | 4,64,227 | 9,12,403 | 9,62,000 |
| 22 | 2007–08 41 (30 जून 07 अखेर पर्यंत) | 39 | सत्र सुरू आहे | 6 | 35,371 | 6,500 | 1,06,800 | 1,48,671 | 1,41,500 |

रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी,
आदिवासी उमेदवारांकरिता रोजगार व
स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र,
चंद्रपूर






आदिवासी उमे. प्रशिक्षण व मार्गदर्शन केन्द्र, चंद्रपूर
प्रशिक्षण वर्ग


ग्रंथालय कक्ष

